
# नऊ आवश्यक स्वातंत्र्ये

## ख्रिस्ताची व्यापक चळवळ सर्वदूर पसरली जावी यासाठी मंडळ्यांना धार्मिक रुढीपरंपरांपासून स्वातंत्र्य मिळणे अगत्याचे आहे

सदर लेख तुम्हाला ही नऊ स्वातंत्र्ये, आपल्या मंडळ्या व गट सफल होऊन बहुगुणित झाल्याचे पाहण्याची इच्छा असणाऱ्या, एखाद्या कार्यशाळेत मार्गदर्शक म्हणून सादर करण्यासाठी उपयोगात आणता येईल.

तुमच्यापैंकी एकजण ह्या नऊ कल्पना सादर करीत असतांना, दुसऱ्याने श्रीयुत परंपराही भूमिका करावी. श्रीयुत परंपरा ह्यांना एखादी वेगळी टोपी घालायला द्या किंवा त्यांचे नाव "श्रीयुत परंपरा" असे मोठ्या अक्षरात लिहिलेला फलक त्याच्या गळ्यात अडकवा. तुम्ही सादर केलेल्या प्रत्येक मुख्य कल्पनेला आक्षेप हरकत घेणे ही श्रीयुत परंपरा ह्यांची भूमिका राहील मग त्यांच्या आक्षेपाच्या हरकतीच्या मुद्याला तुम्ही उत्तर द्यायचे, किंवा श्रीयुत परंपरा यांना इतरांनी उत्तर द्यावे असेही तुम्हाला सांगता येईल आणि ते अधिक चांगले होईल. श्रीयुत परंपराचा कार्यशाळेमध्ये परिचय करून देतांना तुम्हाला असे सांगता येईल, ''तुमच्या मंडळीतही बहुधा श्रीयुत परंपरा हे महाशय असण्याची शक्यता आहे. ते अगदी सर्वत्र असतात! कदाचित् तुम्हीही श्रीयुत परंपरा असाल!''



### 1. स्वातंत्र्य प्रभू शक्य करील तितक्या लवकर तरुण उपासकांना नवीन मंडळ्या सुरू करण्याचे शिक्षण:

- पवित्र शास्त्रातील ज्या आदर्शवत् लोकांनी हे स्वातंत्र्य प्रत्यक्ष अमंलात आणले. त्यात बर्णबा व एपफ्रास ह्यांचा समावेश आहे.
- पवित्र शास्त्रातील प्रेषित- शिष्य जिथे जिथे गेले त्या प्रत्येक ठिकाणी नवीन मंडळ्या सुरू झाल्या. आवश्यक आणि बहुगुणित झाल्या.
- इमारतींचा वापर आणि पगार पाणी ह्या सारख्या गोष्टी शिष्यांनी नव्या मंडळीच्या कामापासून दूर ठेवल्या. आपल्या खर्चाचा भार त्यांनी ह्या मंडळीवर टाकला नाही.

श्रीयुत परंपरा युक्तीवाद करतात: ''आमच्या मंडळीचे धोरण आहे. त्यानुसार एखाद्या मंडळीला दुसरी मंडळी सुरू करायची असेल तर तिने प्रथम मंजुरीसाठी आमच्या विभागिय मुख्यालयाकडे अर्ज केला पाहिजे, अर्जदार मंडळीची विशिष्ट सदस्य संख्या असली पाहिजे, तिला अमुक एक वर्ष पूर्ण झालेली असली पाहिजेत आणि अंदाजफलक भरभक्कम भरीव असले पाहिजे.

### 2. स्वातंत्र्य मानवाने निर्माण केलेले सर्व धार्मिक नियम व परंपरा यापेक्षा ख्रिस्त आणि त्याच्या शिष्यांच्या आज्ञाचे पालन करण्याचे शिक्षण

- पेत्र आणि इतर शिष्यांनी नव्या कराराच्या पहिल्या मंडळीच्या सदस्यांना अगदी आरंभापासूनच ख्रिस्ताचे आज्ञापालन करण्यास प्रे. कृ. 2 मध्ये शिकविले.
- येशूने अनेक आज्ञा दिल्या, त्यांचा थोडक्यात सात मुख्य आज्ञांमध्ये आपल्याला सारांश करता येतो, पहिल्या मंडळीतील पालट झालेल्या 3000 लोकांनी आज्ञा पाळल्याचे आपण प्रे. कृ. 2 मध्ये पाहतो. त्यांनी पश्चात्ताप करून पवित्र आत्मा मिळविला, बाप्तिस्म्याद्वारे आपल्या विश्वासावर शिक्कामोर्तब केले, प्रभुभोजनाचा विधी साजरा केला. एकमेकांवर प्रीती केली (त्यांच्या सहभागितेतून हे दिसले) प्रार्थना केली दान दिले आणि लोकांना शिष्य केले.

श्रीयुत परंपरा आपले म्हणणे मांडतात: ''मी मान्यता दिलेली धोरणेच आपण सर्वांनी राबविली पाहिजेत. एकदिलाने राहिल्यास ऐक्य साधते.''

3. **स्वातंत्र्य: पालट न झालेले शोधक व नवे विश्‍वासणारे ह्यांच्या घरांना भेटी देऊन त्यांच्या स्वत:च्या संस्कृतीत सुवार्ता सांगणे, शिष्य करणे आणि प्रार्थना करण्याचे. शिक्षण:**

- येशूने सत्तरजणांना सेवेसाठी पाठविले तेव्हा पवित्र शास्त्रातील आदर्शांमध्ये कर्नेल्य व येशू ह्यांच्याबरोबर पेत्राचाही समावेश आहे.
- एखाद्या व्यक्तीने विश्वास ठेवताच ते तत्काळ जाऊन त्यांचे कुटुंबिय व मित्रांची भेट घेत, जसे लेवी, कर्नेल्य लुदिया, फिलिप्पै मधील तुरूंग अधिकारी आणि क्रिस्प.
- ते नवीन विश्वासणाऱ्यांना शक्य होईल तितके त्यांच्या नातलगांशी आणि समाजाशी जिव्हाळ्याचे नाते ठेवण्यास सांगत.

श्रीयुत परंपरा आपले मत मांडतात: ''नवीन विश्वासणाऱ्यांना मित्रमंडळी नातेवाईक आणि संस्कृती ह्यांच्या वाईट प्रभावापासून तत्काळ दूर ठेविले पाहिजे.

4. **स्वातंत्र्य: नवीन विश्वासणाऱ्यांना विनाविलंब बाप्तिस्मा देण्याचे आणि ते जिथे असतील तिथे प्रभुभोजनाचा विधी साजरा करण्याचे शिक्षण:**

- पवित्र शास्त्रातील आदर्शांमध्ये ख्रिस्त आणि प्रे.कृ. 2:38-47 मधील यरूशलेमेमधील मंडळीचा समावेश आहे.

श्रीयुत परंपरा आपले मत देतात: बाप्तिस्मा आणि प्रभुभोजन हे विधी दीक्षित आचार्यांनीच केले पाहिजेत, बाप्तिस्मा घेणाऱ्या उमेदवाराने प्रथम पाण्यावर चालले पाहिजे.''

5. **ख्रिस्ताच्या शरीररूपी मंडळीत एकमेकांची सेवा जिव्हाळ्याची, प्रेमळ मंडळी व गट म्हणून करण्याचे आणि पवित्र आत्म्याने दिलेल्या सर्व आध्यात्मिक देणग्या वापरण्याचे स्वातंत्र्य ( 1 करिंथ 14:24-26 ) शिक्षण:**

- पवित्र शास्त्रातील आदर्शांमध्ये करिंथकरांचा समावेश आहे.
- सर्व नवीन विश्वासणाऱ्यांना एकमेकांची सेवा करता यावी यासाठी पवित्र आत्मा त्यांना विशिष्ट आध्यात्मिक कृपादाने देतो.
- मंडळ्यांची उभारणी करण्यासाठी आवश्यक असणारी सर्व आध्यात्मिक कृपादाने कोणत्याही एका पाळका किंवा सेवकाकडे नाहीत श्रीयुत परंपरा ह्यांचे म्हणणे: सर्व गोष्टी औचित्याने व नियमानेच झाल्या पाहिजेत. आणि नियम मी सांगेन तेच! जाहीर सभांचे पुढारीपण फक्त सुशिक्षित पाळाकांनीच केले पाहिजे.''

6. **वडील म्हणून नव्या करारातील पात्रता अटी पूर्ण करणाऱ्यांना, पगारासह किंवा पगाराशिवाय पाळकीय सेवेचे पुढारीपण करण्याचे स्वातंत्र्य शिक्षण:**

- पवित्र शास्त्रातील आदर्शांमध्ये पौल व तीत ह्यांचा समावेश आहे.
- पवित्र शास्त्रात नमूद न केलेल्या पात्रता अटींमध्ये ईश्वर परिज्ञानाचे शिक्षण, आर्थिक कुवत, सामाजिक स्थान, वांशिकता आणि भाषा ह्यांचा समावेश आहे. तुमच्या रूढी परंपरेमध्ये पवित्र शास्त्रात नसलेले कोणते निकष लाविले जातात?

**श्रीयुत परंपरा ह्यांचा युक्तीवाद:** ''पाळक दीक्षितच असले पाहिजेत असा आमच्या मंडळीचा उप-नियम आहे. आमच्या उपनियमांमधील 750 आवश्यक गोष्टी प्रथम त्यांनी पूर्ण केल्या पाहिजेत. त्यांच्याकडे विशिष्ट शैक्षणिक गुणवत्ता असली पाहिजे आणि एखाद्या व्यावसायिकाचा पगार त्यांना मिळाला पाहिजे.''

**7. एखाद्या गटाचा आकार आणि पुढाऱ्याची परिपक्वता यानुसार देवाच्या वचनातून संदेश व शिक्षण देण्यासाठी नव्या करारातील कोणतीही पद्धत वापरण्याचे स्वातंत्र्य शिक्षण:**

- पवित्र शास्त्रातील आदर्शामध्ये 'एकमेकांसाठीच्या आज्ञा' आणि येशूची संभाषण शैली ह्यांचा समावेश आहे.

**श्रीयुत परंपरा ह्यांचे म्हणणे:** देवाने ह्या युगासाठी त्याचे वचन वक्तृत्वपूर्ण शैलीत सांगितले पाहिजे असे ठरविले आहे. पुलपिटवरून संदेश देण्यासाठी आपल्याला अमोघ वक्तृत्वशैली असलेल्या लोकांची आवश्यकता आहे.''

**8. नवीन मंडळ्या व पुढारी ह्यांच्या तात्कालिक गरजांना प्रतिसाद देण्यासाठी पाळकांना प्रशिक्षण देण्याचे स्वातंत्र्य:**

- यासाठी अनेकविध पर्याय असलेल्या अभ्यासक्रमांची आवश्यकता आहे. यामुळे नवीन पुढारी आणि उपदेशकांना प्रत्येक मंडळीच्या उद्याच्या गरजांना अनुरूप असे अभ्यास व कार्यक्रम निवडता येतील.
- सध्याची परिस्थिती आणि तात्कालिक गरजांना प्रतिसाद देण्यास ख्रिस्ताने शिकविले आहे. क्रेतातील नव्या मंडळ्यांमधील उणीवा दूर करण्यास पौलाने तीताला सांगितले.
- सर्व नवीन मंडळ्यांच्या गरजा निरनिराळ्या असतात.

**श्रीयुत परंपरा आपले म्हणणे मांडतात:** माझ्या प्रशिक्षण कार्यक्रमाचा अभ्यासक्रम आदर्श आहे आणि प्रत्येक विद्यार्थी एकच अभ्यास करतो, एकाच ठिकाणी अभ्यासाची सुरुवात करतो सर्वांचा अभ्यासक्रम एकच असतो ते भविष्यात उपयोगी पडणारे शिक्षण घेत असतात.

**9. पौलाने तीताला दिल्या त्याप्रमाणे नव्या मंडळ्यांवर देखरेख करणारे आणि पाळकांना प्रशिक्षण देणाऱ्या विभागिय समन्वयकांना स्वातंत्र्य देणे ( तीत 1:5 ) शिक्षण:**

- पवित्र शास्त्रात स्वतंत्र स्थानिक मंडळीचे उदाहरण नाही.
- नव्या मंडळ्या अपयशी होण्याचे नेहमी दिसणारे कारण म्हणजे, त्यांचे पुढारी अत्यंत अनुभवी अशा पाळकाकडून कधीही मार्गदर्शन आणि सल्ला मागत नाहीत.

श्रीयुत परंपरा त्यांचे म्हणणे मांडतात: ''आम्हाला कोणतीही अधार्मिक श्रेणीबद्ध अधिकार परंपरा किंवा कशावर विश्वास ठेवावा आणि काय करावे यासाठी उपासकांवर हुकूम गाजवणारे बिशप नको. स्थानिक मंडळीवर आमचा अधिकार आहे.'' किंवा: ''मी बिशप असून ह्या भागाचा पर्यवेक्षक म्हणून माझी नेमणूक झालेली आहे आणि माझ्या न्यायाधिकारात येणाऱ्या भागात कोणा समन्वयकाने येऊन अधिकार गाजविणे मला चालणार नाही. तसेच नवे कार्यक्रम आयोजित करण्यास माझ्याकडे वेळच नाही! म्हणून आहे तसेच आम्ही पुढे चालू ठेवू.''

Copyright 2003 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net